दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १०४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.८ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दिग्गज अभिनेते दिलीप कुमार काळाच्या पडद्याआड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते दिलीप कुमार यांचं निधन झालं असून ते ९८ वर्षांचे होते. आज सकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे दिलीप कुमार यांना २९ जून रोजी मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहितीही समोर येत होती. परंतु, प्रकृती अस्वास्थामुळे आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. अनेक दिवसांपासून दिलीप कुमार यांच्यावर उपचार सुरु होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे मुंबईतील खारमधील हिंदूजा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यानंतर डिस्चार्ज देण्याच्या एक दिवस अगोदर एका मायनर सर्जरीमार्फत दिलीप कुमार यांच्या फुफ्फुसांत जमा झालेलं पाणी काढण्यात आलं होतं.



# केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात १५ कॅबिनेट, २८ राज्यमंत्र्यांना शपथ

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

**केंद्रीय मंत्रिमंडळाचा दिल्लीत विस्तार झाला. राष्ट्रपती भवनात ४३ मंत्र्यांचा शपथविधी झाला. यात महाराष्ट्रातील ४ नेत्यांचा समावेश आहे. नारायण राणे यांना कॅबिनेट तर कपिल पाटील, भारती पवार आणि भागवत कराड यांना राज्यमंत्री पद मिळालं आहे. अद्याप खातेवाट जाहीर झालेलं नाही. पण नारायण राणेंना केंद्र सरकारने नवीनच स्थापन केलेल्या सहकार मंत्रालयाची जबाबदारी दिली जाईल, अशी चर्चा आहे. मंत्रिमंडळात ३६ नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी देण्यात आली आहे. तर ७ विद्यामान मंत्र्यांना पुन्हा संधी दिली गेली आहे.**



नरेंद्र मोदी यांच्या दुसऱ्या टर्ममध्ये पहिला मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला आहे. यामध्ये एकूण ४३ मंत्र्यांनी शपथ घेतली. यामधील १५ मंत्र्यांना कॅबिनेट तर २८ मंत्र्यांना राज्यमंत्रिपदाची शपथ देण्यात आली आहे. २०२२ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका आणि २०२४ ची लोकसभा निवडणूक पाहता हा मंत्रिमंडळ विस्तार महत्वाचा मानला जात आहे. यामध्ये महाराष्ट्रातून नारायण राणे यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळणार आहे. तर कपिल पाटील, भारती पवार आणि भागवत कराड यांना राज्यमंत्रीपद मिळालं आहे.

येत्या काही दिवसांमध्ये किंवा पुढील वर्षी देशात विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. तिथे भाजपनं ७ मंत्रिपदं दिली आहेत.

तर दुसरीकडे कर्नाटक, त्रिपुरा, गुजरात आणि उत्तराखंड या राज्यातील नेत्यांनाही भाजपनं मंत्रिपदं दिली आहेत. त्यामुळे या मंत्रिमंडळ विस्तारातून त्या त्या राज्यांमध्ये भाजपच्या पक्षसंघटनेला बळ मिळण्याची शक्यता आहे.

### या नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश

**कॅबिनेटमंत्री** : नारायण राणे, सर्वानंद सोनोवाल, विरेंद्र कुमार, ज्योतिरादित्य शिंदे, रामचंद्र प्रसाद सिंह, अश्विनी वैष्णव, पशुपती कुमार पारस, किरेन रिजीजू, राजकुमार सिंह, हरदीप सिंग पुरी, मुकेश मांडवीय, भुपेंद्र यादव, पुरुषोत्तम रुपाला, जी. किशन रेड्डी, अनुराग सिंह ठाकूर

**राज्यमंत्री** : पंकज चौधरी, अनुप्रिया सिंह पटेल, सत्यपाल सिंह बघेल, राजीव चंद्रशेखर, शोभा करंदजले, भानु प्रताप सिंह वर्मा, दर्शना विक्रम जरदोश, मिनाक्षी लेखी, अन्नपूर्णा देवी, ए. नारायणस्वामी, कुशाल किशोर, अजय भट्ट, बी. एल. वर्मा, अजय कुमार, चौहान देवुसिन्ह, भगवंत खुबा, कपिल मोरेश्वर पाटील, प्रतिमा भौमिक, सुभाष सरकार, भागवत किशनराव कराड, राजकुमार रंजन सिंह, भारती प्रवीण पवार, बिश्वेश्वर तुडू, शंतनू ठाकूर, मंजुपारा महेंद्रभाई, जॉन बारला, मुरूगन, निसिथ प्रामाणिक

## संक्षिप्त...

### अलिबागमध्ये पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग येथे मंत्र्याच्या डिव्ही कारवर चालक म्हणून काम करीत असलेल्या पोलीस कर्मचार्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

प्रशांत जगजीवन ठाकूर (वय ३५) असे या पोलिसाचे नाव असून, त्याने शिवाजी नगर येथे आपल्या राहत्या घरी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. बुधवारी (७ जुलै) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. प्रशांत ठाकूर हा अलिबाग पोलीस ठाण्यात पोलीस नाईक म्हणून काम करीत होता. प्रशांत याची नुकतीच मंत्री महोदयांच्या डिव्ही कारवर चालक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. बुधवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास डिव्ही कारची चावी घेण्यासाठी पोलीस कर्मचारी हा प्रशांत याच्या घरी आला होता. मात्र बराच वेळ दरवाजा न उघडल्याने त्याने पोलीस ठाण्यात संपर्क साधला. पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला, तेव्हा ही घटना समोर आली. अलिबाग पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करुन प्रशांत याचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. प्रशांतने आत्महत्या का केली? याचे स्पष्ट कारण अद्याप समजू शकलेले नाही. दरम्यान, या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

## सेवानिवृत्त अधिकारी यांना शासकीय सेवेत पुन्हा रूजु करण्याचा जी.आर त्वरीत रद्द करावा

### सुशिक्षित बेरोजगार युवकांची मागणी

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : राज्यात अनेक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेत कंत्राटी पध्दतीने मानधन सुविधेवर रूजु करून त्यांना वेतन दिले जाते. परंतु यामुळे अनेक सुशिक्षीत तरूण, तरूणींना शासकिय तथा स्थानिक स्वराज्य संस्थेत तसेच बहुतांश शासन स्तरातील नोकरीस अक्षरशः मुकावे लागते. नुकतेच पुण्यातील एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करूनही नोकरी न मिळाल्याने स्वप्निल लोणकर या २४ वर्षीय तरूणाने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. तसेच कोविड काळातही अनेकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत. याअनुषंगाने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता सेवानिवृत्त असलेल्यांना पुन्हा सेवेत मानधन देवून २०१७ चा जी.आर. नुसार घेतले जाते, तो जी.आर.रद्द करावा अशी मागणी सुशिक्षित बेरोजगार युवकांकडून लावून धरली जात आहे.

आज मितीला राज्यात अनेक शासकिय सेवेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी त्यांच्या (पदानुसार) केवळ त्यांच्या कामाच्या अनुभवाच्या जोरावर शासकिय सेवेत सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांना शासनाच्या विविध नोकर भरतीत अटी शर्तींच्या अधीन राहुन त्यांच्या पदानुसार मानधन सुविधा देऊन समाविष्ट केले जाते. परंतु त्याचा फटका हा न कळत होतकरू सुशिक्षीत युवकांना बसत आहे. बहुतांश शासकीय सेवेत नोकरीचा कालावधी संपल्याने सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे वय ५८ च्या सरासरी पुढे असते त्यांना शासनाची रग्गड पेन्शन देखील सुरू असते.

परंतु शासनाच्या २०१७ च्या चुकीच्या शासकीय जी.आर.मुळेच त्यांची पुन्हा शासकीय सेवेत सेवानिवृत्तांची वर्णी लागते. एकीकडे पेन्शन व पुन्हा शासकीय सेवेतील १५ ते २० हजार मानधन अथवा सेवानिवृत्त पद मोठे असेल तर यापेक्षा देखील मोठ्या आकड्याचे मानधन किमान वय वर्षे ६५ होईपर्यंत दिले जाते. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार युवकांना शिक्षण घेऊनही नोकरी दुरापास्त होत आहे.

सेवानिवृत्त अधिकारी यांना अनुभव असतो म्हणे? तर मग शिक्षीत तरूण यांच्या जागी येऊन काम करणार नाही का? त्याला शासकीय नोकरीत समाविष्ट केल्यास अन्य नोकरीत समाविष्ट असलेले वरिष्ठ अधिकारी यांच्या हाताखाली राहुन तो तरूण कालांतराने का होईना हळुहळु उत्तम प्रशिक्षित होणार नाही का? सेवानिवृत्त अधिकारी यांनी देखील त्यांच्या कार्यकाळात कुणाच्या तरी हाताखाली काम करूनच ते एक सक्षम अनुभवी अधिकारी होऊनच सेवानिवृत्त झाले ना? मग तरूण शिक्षीत तरुणांच्या नोकरी हिरावण्याचा अधिकार शासनानेच या सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना दिला आहे का? असा सवालही सुशिक्षित बेरोजगार तरुणांकडून विचारला जात आहे.

आज राज्यात महावितरण, महसुल, महानगरपालिका, नगरपालिका, विविध स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे अशा अनेक ठिकाणी शासनाच्या चुकीच्या जी.आर.मुळेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या भरती झालेली आहे. त्यांना दरमहा भरमसाठ पगार दिला जात आहे त्यामुळे शिक्षीत तरूण शासकिय नोकरी पासून वंचीत रहात आहे.

## खोपोली शीळफाटा येथे भीषण अपघात ; १ ठार २ गंभीर



**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरातील शिळफाटा येथील इंदिरा चौकात आज सकाळी ६.४५ च्या सुमारास पुण्याकडून मुंबई कडे जात असलेल्या तांदूळाने भरलेल्या ट्रक चा भीषण अपघात झाला, या भरधाव बेकाबू ट्रक ने दोन बाईकस्वारांना धडक दिली असून यात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत तर अपघाता नंतर या ट्रक ने पेट घेतल्याने काही काळ या रस्त्यावरील रहदारी प्रभावित झाली होती.

मिळालेल्या माहिती नुसार सकाळी ६.४५ च्या दरम्यान एक तांदळाने भरलेला ट्रक पुण्याकडून मुंबई कडे जात असलेल्या ट्रक चे ब्रेक फेल झाला असावा त्यामुळे उतारावरून येताना हा ट्रक बेकाबू झाला होता. भरधाव येत असताना पुढे इंदिरा चौकात वाहनांची कायम मोठी गर्दी असते पण सकाळ असल्याने वाहतूक व गर्दी तुरळक होती. तरीही हा ट्रक इंदिरा चौकातील पाताळगंगा नदीवरील पूलावरून जात असताना समोरून दोन बाइक येत होत्या त्या दोन ही बाईकना या ट्रक ने जोरदार ठोकर दिली व पुढे जाऊन तो ट्रक पूलाच्या काठड्याला धडकुन थांबला.

या ट्रक ने ज्या बाईकना धडक दिली होती या बाइक वरील तीन जण गंभीर जखमी झाले होते त्यांना नागरिकांनी तात्काळ न पा हॉस्पिटल मध्ये दाखल केले उपचारा दरम्यान यातील एम जण मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले तर दोन जण गंभीर जखमी .../२

## कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका ; मुख्यमंत्र्यांनी साधला सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क

**दै.रायगड नगरी । मुंबई**

करोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी तिसऱ्या लाटेची शक्यता वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार सज्ज झालं आहे. संभाव्य तिसऱ्या लाटेचा राज्यातील अर्थचक्रावर कोणताही परिणाम होऊ नये या दृष्टीनं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त आणि पोलीस अधिकाऱ्यांशी मुख्यमंत्री ठाकरे यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा केली व करोना स्थितीचा आढावा घेतला.



मुख्यमंत्री ठाकरे यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा केली व करोना स्थितीचा आढावा घेतला.

’प्रत्येक जिल्ह्यातील मोठ्या उद्योगपतींची बैठक घेऊन संभाव्य तिसऱ्या लाटेत उद्योग सुरू ठेवण्याच्या दृष्टीनं मार्गदर्शन करावं, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ’ज्या उद्योजकांना कामगारांच्या राहण्याची व्यवस्था कंपनीच्या आवारात करणं शक्य आहे, त्यांनी वेळीच तसं नियोजन करावं व ज्या उद्योजकांना ते शक्य नाही त्यांनी कंपनीच्या आसपासच्या परिसरात अशी जागा शोधून कामगारांची तिथं राहण्याची (फिल्ड रेसिडन्स) व्यवस्था करावी. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी उद्योजकांना आवश्यक ते सहकार्य करावं,’ अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

करोनाची दुसरी लाट अद्यापही पूर्णपणे ओसरलेली नाही. मात्र, याही स्थितीत कॅलक्युलेटेड रिस्क घेऊन आपण हळुवारपणे काही आर्थिक उपक्रम सुरू करत आहोत. हे करताना कुठलेही निर्बंध कागदावर राहणार नाहीत, ते काटेकोरपणे अमलात येतील, कुठेही गर्दी होणार नाही, सभा समारंभ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

आता पावसाळा आहे, या काळात साथीचे इतर आजार उद्भवतात. त्यात करोना विषाणूचा .../२

## कामोठे वसाहतीमध्ये मनपाच्या धोरणाच्या विरोधात मुक मोर्चा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने पाच वर्षाचा मालमत्ता कर लागू केला आहे. त्याची रक्कम मोठी आहे. त्याचबरोबर सेवा दिला जात नसतानाही वेगवेगळया विषयाखाली कर घेतला जात आहे. याला रहिवाशांनी विरोध दर्शवला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरीता कामोठेकरांनी बुधवारी मुक मोर्चा काढून चुकीच्या मालमत्ताकराला एक प्रकारे बोलका विरोध दर्शवला. फलक दाखवून मनपाच्या धोरणाला विरोध दर्शविण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेची २०१६ साली स्थापना करण्यात आली. तेव्हा-पासून पाच वर्षांचा थकीत कर मनपा प्रशासनाने लागू केला आहे. वास्तविक पाहता जेव्हा ठराव झाला तेव्हाप-ासून कर लागू करणे आवश्यक आहे. मात्र मनपाने स्थापनेपासून कर आदा करण्याबाबत रहिवाशांना सुचीत केले आहे. त्याचबरोबर कचरा वगळता बाकी सर्व सुविधा सिडको देते. त्याबदल्यात सेवा शुल्क वसाहतीतील रहिवाशांनी भरलेले आहे. तरीही पाणी, मलनिः सारण, शिक्षण, अग्निशमन सेवेबाबत कराचा रचनेत समावेश करण्यात आलेला आहे. जी सेवा महानगरपालिकेने दिलीच नाही त्याचा कर आम्ही का दयायचा अशी भूमिका रहिवाशांनी घेतली आहे. त्याचबरोबर सामाजिक संस्था तसेच विरोधी पक्षानेही मालमत्ता कराला विरोध दर्शवला आहे. बुधवारी कामोठे वसाहतीत रहिवाशांनी एकत्रीत येऊन मुक मोर्चा काढला. मानसरोवर गृहसंकुलापासून हा मोर्चा सुरू झाला. त्यामध्ये महिला, जेष्ठ नागरिक त्याचबरोबर चाकरमानी सहभागी झाले होते. कर नाही तर डर कशाला सेवा , सुविधा नाही तर कर कशाला, महापालिका कर घेणार सुविधा कोण देणार, प्रशासनाने जनतेचे ऐकले पाहिजे, मालमत्ता कर कमी केला पाहिजे, जुलमी मालमत्ता कर लावणार्यो पनवेल महापालिकेचा निषेध, नाही भरणा नाही भरणार मालमत्ता कर नाही .../२

## वीज कंपनीने पार्ट पेमेंट पर्याय केला बंद ; नागरिकांमध्ये संताप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कोरोना संसर्ग महामारीच्या दुसऱ्या टप्प्यात देखील सरकारने कडक निर्बंध लावून नागरिकांच्या रोजगारावर टाच आणली, त्यामुळे कामगार, चाकरमणी, फेरीवाले, हातगाडीवर धंदा करणारे यांना रोजगारा अभावी कठीण परिस्थितीत दिवस कंठावे लागत असतानाच कर्जतमध्ये वीज कंपनी बिले भरण्यासाठी तगादा लावत असून नागरिकांची पिळवणूक करताना दिसत आहेत. त्यातच पार्ट पेमेंट हा पर्याय वीज कंपनीच्या अधिका-यांनी बंद केला असल्याने अर्धी - मुरदी रक्कम भरून वीज सुरळीत चालू ठेवण्याचा मार्ग देखील बंद केल्याने कर्जतमध्ये नागरिकांत संताप पसरला आहे.

कोरोना काळात रेल्वे गाड्या बंद असल्याने बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, विठ्ठलवाडी येथे एमआयडीसी कारखान्यात अथवा इतर ठिकाणी कामावर जाणारे चाकरमणी, कामगार व महिलावर्ग कामावर न जाता आज दोन वर्षे झाले घरी बसून आहेत.रोजगार अभावी दोन वेळेचं निटवर जेवण मिळत नसताना पर्यायाने वीज कंपनीचे वीज बिल ते भरू न शकल्याने थकीत राहिले आहे. बिलांची वसुली करताना थकीत राहिलेल्या .../२

## नैसर्गिक बांधलेली घरे गरज ओळखून कायम करावीत ; आ.बाळाराम पाटील यांची विधानसभेत मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबांची नैसर्गिक वाढीपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत गावांचे गावठाण विस्तार, गावठाण हद्दी निश्चिती, सिटी सर्वेक्षण यासाठी सिडकोने दुर्लक्ष केल्यामुळे गावठाणातील आणि विस्तारित गावठाणातील घरांचे सिटी सर्वेक्षण अभावी सनद (प्रॉपर्टी कडे) नाकारल्याने सदरची घरे अनधिकृत ठरवली जात आहेत. या पार्शवभूमीवर यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी करण्यात आली होती. नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांनी पुन्हा एकदा ही मागणी सभागृहात मांडली आहे, आणि सभागृहाकडे मागणी केली आहे.

नवी मुंबई, पनवेल, उरण येथे प्रकल्पग्रस्तांनी जी गरजेपोटी घरे बांधली आहेत ती सिडकोने अनधिकृत बांधकामे म्हणून घोषित केली आहेत. राज्य शासनाकडे दिनांक २२ जानेवारी २०१० रोजी प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याचा प्रस्ताव सिडको महामंडळाने ठराव करून दिनांक ३ ऑक्टोबर २००८ रोजी निर्णय घेतलेला असून अद्यापही गरजेपोटी घरे नियमित करण्यात आली नाहीत. वारंवार निवेदने व बैठका .../२

# कथा एका कायद्याची

सर्वोच्च न्यायालयाने एखादा निकाल दिला, की त्याचे रूपांतर कायद्यात होते. त्या निकालाच्या चौकटीच्या बाहेर होणारे वर्तन बेकायदा ठरते आणि कारवाईसही पात्र ठरते. त्याचप्रकारे, सर्वोच्च न्यायालयाने एखादा कायदा किंवा कायद्यांमधील काही कलमे घटनाबाह्य ठरविली, तर तो कायदा रद्दबातल होतो. संसदेने मंजूर करून राष्ट्रपतींच्या मान्यतेची मोहोर उमटली असली, तरी त्या कायद्याची किंमत शून्य होते. भारतीय न्यायव्यवस्थेचे इतके महत्त्व असूनही देशातील सारे व्यवहार कसे चालतात, हे साऱ्यांना माहीत आहे; मात्र ज्यांच्यावर कायद्याच्या पालनाची, अंमलबजावणीची आणि ते राबविण्याची जबाबदारी आहे, ती देशातील पोलिस दलेच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल कानाआड करून जुनेच कायदे राबवित असतील तर? सन २००० मध्ये झालेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्यातील ६६-ए हे कलम भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करते. यासाठी, ते या कायद्यातून काढून टाकण्यात यावे, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २०१५मध्येच दिला होता. विशेष म्हणजे, त्यानंतर हे कलम वापरून देशभरात हजारापेक्षा अधिक गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. कदाचित, काही प्रकरणांमध्ये शिक्षाही झाली असू शकेल. देशातील कायद्याच्या राज्याची ही अवहेलना 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' म्हणजे पीयूसीएलने केलेल्या याचिकेमुळे नजरेस तरी आली. नाही तर हे असे किती काळ चालू राहिले असते कुणास ठाऊक. विशेष म्हणजे, या घटनाबाह्य ठरलेल्या कलमाचा वापर करून गुन्हे नोंदविण्यात, देशात महाराष्ट्राचा क्रमांक पहिला लागला आहे. हे सगळे प्रकरण समोर आल्यानंतर न्यायमूर्तींना कपाळावर हात मारून घेण्यावाचून दुसरा काही पर्याय उरला नाही. निकालपत्रामधून त्यांची हतबलता आणि क्षोभ प्रकट झाला आहे. तसे म्हटले, तर न्यायव्यवस्थेची खरी ताकद ही तिचे आदेश व निकाल पाळणाऱ्या सामान्य नागरिकांमध्ये जशी असते; तशीच ती या निकाल व आदेशांची यथायोग्य तामिली करणाऱ्या प्रशासन आणि पोलिस दलांमध्येही असते. या साऱ्यांनी मिळून न्यायालयांच्या आदेशांची अंमलबजावणीच जर केली नाही, तर सारी घटनात्मक यंत्रणा व व्यवस्थाच पराभूत होईल. तसे अनेक मार्गांनी आज होतेही आहे; मात्र सर्वोच्च न्यायालयाचा आदेशच सहा वर्षे पोलिस दलांकडून बेदखल राहण्याची घटना पूर्वी कधी घडली नसेल. श्रेया सिंघल या ब्रिटनमध्ये उच्च शिक्षण घेऊन भारतात परतल्यानंतर कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या २४ वर्षांच्या तरुणीने २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका केली. तेव्हाचे सरन्यायाधीश कबीर यांनी 'गेल्या १२ वर्षांत इतकी मोठी उणीव कुणाच्या लक्षातच कशी आली नाही?' असे विचारत श्रेयाला शाबासकी दिली होती. 'प्रत्येक व्यक्तीच्या समाजमाध्यमांवरील आविष्कारांचा इतक्या कडक कायद्यांनी गळा घोटला, तर उद्या आपला सारा समाज भयाने मूक होऊन जाईल,' असा श्रेयाचा युक्तिवाद होता. भारताचे एकेकाळचे कायदामंत्री एच. आर. गोखले हे तिचे पणजोबा, तर न्यायमूर्ती सुनंदा भंडारे या आजी. महाराष्ट्राचे तिच्याशी असे नाते असूनही, हे कलम रद्द झाल्यानंतरही त्याखाली देशातील सर्वोच्च, म्हणजे ३४९ खटले दाखल करून महाराष्ट्राने तिला खासा काव्यगत न्याय दिला. पीयूसीएलने हे प्रकरण खंडपीठाच्या दृष्टोत्पत्तीस आणले, तेव्हा आधीचा निकाल दिलेल्या खंडपीठाचे एक सदस्य असणारे न्या. रोहिंग्टन फली नरीमन यांना धक्काच बसला. 'हे भयंकर आणि धक्कादायकच आहे,' असे ते म्हणाले; मात्र ॲटर्नी जनरल के. के. वेणुगोपाळ यांचा युक्तिवादही सयुक्तिक होता. कायद्यातील कलमे रद्द होतात, तेव्हा नव्याने छापल्या जाणाऱ्या कायदेपुस्तिकांमध्ये मूळ कलमे तशीच ठेवतात आणि खाली एक बारीकशी तळटीप टाकतात, की अमुक क्रमांकाचे कलम आता अवैध व व्यपगत, म्हणजे रद्द झाले आहे. ही तळटीप न वाचताच देशभरातल्या पोलिस दलांनी आयटी कायद्याखाली दे दणादण कारवाई केली असणार. हे त्यांनी हेतुतः केले नसले, तरी ही चूक क्षम्य म्हणावी, अशी नाही. बाद कलमांच्या शेजारीच 'रद्द' असे ठळक छापावे, ही वेणुगोपाळ यांची सूचना योग्य असली, तरी या घोटाळ्याची जबाबदारी हवालदार किंवा कनिष्ठ अधिकाऱ्यांची नसून, त्यांच्या आयपीएस किंवा तत्सम वरिष्ठांची अधिक आहे. सामान्यतः आयटी कायद्यातील खटले अनेक कलमे जोडून भरले जातात; त्यामुळे या एकाच कलमाने शिक्षा झाल्याची प्रकरणे देशात फारशी नसतीलही. जर असतील, तर त्यांच्या शिक्षा रद्द होतील आणि नव्याने सुनावणी घ्यावी लागेल. या याचिकेत एक मुद्दा आला की नाही, हे माहीत नाही; मात्र भारतातील अनावश्यक व कालबाह्य कायद्यांचे जंगल साफ करून सोपे, सुटसुटीत आणि परस्परच्छेदन न करणारे कायदे हवेत. असे जंगल अनेकांच्या सोयीचे असले, तरी कायदा राबविणाऱ्या यंत्रणांसाठी ते जिकिरीचे ठरते. श्रेया सिंघलच्या मूळ याचिकेने सुरू झालेली भारतातील एका कायद्याची कथा ही अशी आहे.

# उन पावसाच्या खेळात उष्णतामान वाढले शेती करणे झाले कठीण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

प्रखर उन, लावणीला नाही पाणी, शेतकरी काळजीत. आपल्या रायगडात अजुनही पारंपारिक पध्दतीनेच शेती करतात. गेल्या काही दिवसात पाऊस गायब झाला भातशेतीचे आवन, रोप चांगली डवरली होती. नांगरणी पूर्ण झाली आहे. आता शेतीला भरपूर पाण्याची गरज आहे. कारण पाऊस नसल्याने लावणी खोळंबलीय. म्हणुन बळीराजावर पंपाद्वारे जवळच्या नदीतून ओहोळातुन शेताला पाणी घ्यायची पाळी आली आहे. पाण्या अभावी आता रोप पिवळी पडतिल, लावणी होईपर्यंत भात रोप मुळात हिरवी राहीली तर जीव धरतील अन्यथा सुकुन जातील, नुकसान होईल अशी भिती व्यक्त होत आहे. सुदैवाने परवा पाऊस पडला शेतात पाणी साचले आता आशेचा किरन निर्माण झाला आहे.

लावणी उरकता येईल वातावरणातील बदल आणि उन्हाची तिव्रता या मुळे शेतकरी आरोग्यविषयक समस्या मात्र निर्माण झाली आहे. या बाबत माणगांव खांदाड येथिल शेतकरी राजेंद्र पवार यांनी म्हटले कि सध्या तरी शेतीला गरजेपुरता पाऊस पडलाय. परंतु एक दिवस पडतो आणि दुसरे दिवशी कडक उन्हामुळे शेतीतील पाणी पटकन निघुन जाते. शेतीचे कामास माणस मिळत नाहीत, कोरोनाच भय आहेच. घरातील सर्व महिला पुरुष कुटुंबिय मिळुन व काही आदिवासी माणस मजुरीने कामाला घेऊन लावणी पटापट उरकत घेत आहोत. निसर्गातील या अनाकलनिय बदलांमुळे शेती करणे कठीण झाले आहे. चांगली रोप करपुन जातील किंवा एक दिवसात मुसळधार पडणाऱ्या पावसाने लावलेली भातरोप पाण्याखाली जातात,अस दुहेरी संकट आहे. आपल्या भागात पट्टी पट्टीत चोंढ्यात छोट्या प्रमाणात शेती केली जाते. त्यात महाग खते, बियाणे आणि हे निसर्गाचे संकट त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे ही समाधानाची बाब आहे परंतु आता मात्र उन पाऊस खेळ सुरु आहे. त्यात उष्णतामान वाढले आहे. शेती निसर्ग लहरी झाली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोपोली शीळफाटा येथे भीषण अपघात ; १ ठार २ गंभीर

असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू केले.पघातग्रस्त ट्रक नदीच्या पूलाला धडकल्या नंतर त्यातील तांदूळ रस्त्यावर सांडला होता व त्या त्राक ने अचानक पेट घेतला या वेळी घटनेची माहिती मिळताच आजूबाजूचे नागरिक मदतीला धावले,काही वेळातच खोपोली पोलिस तेथे पोहचले तर अपघातग्रसतांचे मदतीला ग्रुप चे अध्यक्ष गुरूनाथ साठेलकर आपल्या टिम सह तेथे पोहचले व अपघातग्रसताना मदत केली. सादर ट्रक ने पेट घेतल्याने या मार्गावर वाहतूक थांबवण्यात आली होती व दुसऱ्या मार्गे वाहनांना सोडण्यात आले.

## मुख्यमंत्र्यांनी साधला सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क

प्रादुर्भाव आहे. याच काळात आपले सणउत्सव सुरू होतात. ही सगळी परिस्थिती अतिशय काळजीपूर्वक हाताळण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हानिहाय ऑक्सिजनच्या तयारीचाही आढावा घेतला. त्यांनी ऑक्सिजन निर्मिती, ऑक्सिजन साठा आणि रुग्णसंख्या वाढल्यास करावयाची पूर्वतयारी या सर्वच प्रक्रियेला वेग देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या. आशा, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत गावागावांत जनजागृती करून करोना प्रतिबंधक लसीचा पहिला डोस घेतलेले सर्वजण दुसरा डोस वेळेत घेतील यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. लसीचे दोन्ही डोस घेऊन करोना बाधित होणाऱ्यांची संख्या, त्यांची स्थिती आणि कारणे याचे टास्क फोर्सने विश्लेषण करावे, ही माहिती संकलित करताना ती अनुभवजन्य राहील याची काळजी घ्यावी, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

## कामोठे वसाहतीमध्ये मनपाच्या धोरणाच्या विरोधात मुक मोर्चा

भरणार असे संदेश लिहिलेले फलक दाखवून मोर्चेकरांनी सर्वांचे लक्ष वेधले. कामोठे पोलीस ठाण्यासमोरील चौकात मोर्चाची सांगता झाली.यावेळी शिक्षक आमदार बाळाराम पाटील, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, शंकर म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुदाम पाटील, एकता सामाजिक संस्थेचे अमोल शितोळे, मंगेश अढाव,प्रशांत कुंभार सिटीझन युनिटी फोरमच्या रंजना सडोलीकर, दिशा महिला मंचच्या संस्थापिका निलम आंधळे,अस्मिता सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा ॲड सुलक्षणा जगदाळे,संगिता राऊत राष्ट्रवादीचे सरचिटणीस सुरदास गोवारी, शहराध्यक्ष चंद्रकात नवले, निलेश लंके प्रतिष्ठानचे संपर्क प्रमुख भाऊशेठ पावडे, दिलीप घुले, समर नवले, सचिन वाफारे यांच्यासह विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका लिना अर्जुन गरड यांनी सुरूवातीपासून मालमत्ता कराला विरोध दर्शवला आहे. त्यांनी याबाबत खारघर फोरमच्या माध्यमातून या कराविरोधात जनजागृती केली होती. त्याचबरोबर विरोधी पक्षाच्या नगरसेविकांबरोबर सभागृहात जावून मालमत्ता कराला विरोध केला होता. दरम्यान बुधवारी कामोठे येथील मुक मोर्चात गरड या सहभागी झाल्या. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना हा अन्यायकारक कर भरण्याचे आवाहन उपस्थितांना केले. मालमत्ताकरा विरोधात कामोठेकरांनी खर्यांग अर्थाने एल्गार पुकारला. याचे लोण इतर वसाहतीत सुध्दा पसरेल आणि तेथेही विरोधात अशा प्रकारे रहिवाशांचा उद्रेक होईल. शेवटी महापालिका प्रशासनाने ही कररचना मागे घ्यावी लागेल असे मत शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले. विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी हा अन्यायकारक कराविरोधात एकजुटीने लढा देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. याला सत्ताधारी भाजप जबाबदार असल्याचे नगरसेवक गणेश कडू यांनी सांगितले.

## वीज कंपनीने पार्ट पेमेंट पर्याय केला बंद ; नागरिकांमध्ये संताप

बिलांसाठी वीज कंपनीचे अधिकारी नागरिकांची पिळवणूक करत आहेत.अजूनही कोरोना महामारीचा काळ संपलेला नसल्याने नागरिकांची आर्थिक परिस्थिती सुरळीत झालेली नाही. यामुळे नागरिकांत संताप पसरला आहे. कामगार वर्ग कामावर नसल्याने घरात पगार रुपी पैसे येत नाहीत त्यामुळे गाठीशी पैसेच नसल्याने तातडीने वीज बिल भरणार कसे ? हा यक्षप्रश्न नागरिकांना पडला आहे .त्यातच पार्ट पेमेंट देखील वीज कंपनीच्या अधिकारी वर्गाने बंद केल्याने नागरिकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. थकीत वीज बिलांची रक्कम हफ्त्यांनी वसुली करावी जेणेकरून घरातील वीज पुरवठा सुरळीत राहील ,मात्र कर्जत वीज कंपनी कार्यालयाच्या बाहेरच पार्ट पेमेंट मिळणार नाही ,असा फलक लावला आहे.संपूर्ण रक्कम नागरिकांकडे नसल्याने अर्धी रक्कम भरण्याची परवानगी मागण्यासाठी गेल्यास उपकार्यकारी अभियंता देवके हे पार्ट पेमेंट देत नसल्याने नागरिक हतबल होत असताना दिसत आहेत.वीज कंपनीच्या कर्जत कार्यालयावर अनेक राजकीय पक्षांनी काढलेल्या मोर्चाच्या वेळी हफ्त्या - हफ्त्यांनी आम्ही वसुली करू ,या वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेले आश्वासन ते पाळत नसून नागरिकांची वीज कटिंग चालू केली आहे.

## नैसर्गिक बांधलेली घरे गरज ओळखून कायम करावीत

घेऊन ही सदरील घरे ही नियमित करण्यात आलेली नाहीत, त्यामुळे नवी मुंबई, पनवेल, उरण येथील प्रकल्पग्रस्तांनी जी घरे गरजेपोटी बांधली आहेत. ती कायम करण्यासाठी आमदार बाळाराम पाटील यांनी अधिवेशनात सूचना मांडून मागणी केली आहे.

यावेळी गरजेपोटी घरे कायम होण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेचा मुख्य उद्देश सिडकोला नफा मिळवून देणे नसून गावठाण भोवतालच्या क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास व्हावा हा आहे, प्रकल्पग्रस्तांनी एक गरजेपोटी बांधलेली आहेत ती घरे जमिनी सहित सिडकोकडून नियमित करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यासाठी राज्य शासनाकडून तत्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी अधिवेशनाच्या औचित्याने विधानसभेचे सभापती यांच्याकडे केली आहे.

# माथेरानमध्ये वृक्षारोपण करताना संवर्धन अधिक महत्त्वाचे : स्थानिकांचे मत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दरवर्षी पावसाळ्यात माथेरान मध्ये वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. एकदा लावण्यात आलेली रोपे जगतात की नाही, वृक्षारोपण कार्यक्रम पार पडल्यानंतर याकडे फारसे कुणी गांभीर्याने लक्ष केंद्रित करतात की नाही हा संशोधनाचा विषय आहे. परंतु काही होईना माथेरान मध्ये हा कार्यक्रम मोठया उत्साहात पार पाडला जात आहे. याहीवेळी वनखात्याच्या माध्यमातून वन संरक्षक समितीने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला आहे. अनेक प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत हा भव्य कार्यक्रम येथील दस्तुरी नाक्याजवळच्या माऊंट बेरी परिसरात जवळपास चारशे रोपे लावण्यात आली आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात आहे.माथेरान मध्ये अधिकाधिक फळांची रोपे लावल्यास याचा लाभ येथील विशेष आकर्षण असणाऱ्या माकडांना खाद्य म्हणून उपयोगात येऊ शकतो जेणेकरून त्यांची क्षुधा यामुळेच भागू शकते. परंतु आणण्यात आलेली बहुतांश फळांची रोपे ही वृक्षारोपण कार्यक्रमा पूर्वीच माथेरानच्या खालील भागात राहणाऱ्या वृक्ष प्रेमींनी नेलेली असल्याचे समजते. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करून आणण्यात आलेली रोपे व्यर्थ जात आहेत. माथेरान हे केवळ इथल्या घनदाट वनराई मुळेच प्रसिद्ध आहे. दरवर्षी पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे अनेक जुनी झाडे उन्मळून पडतात त्यामुळे अनेक ठिकाणी मोकळे रान झालेले पहावयास मिळते.वृक्षारोपणाची खरी गरज ही माथेरान मध्ये आहे परंतु आणलेल्या रोपांची योग्यप्रकारे देखभाल न केल्यामुळे ही रोपे परिसरातील लोकांनी नेल्याचे समजते. वृक्षारोपण हे पुण्यकर्म असून लहान मुलांप्रमाणे त्यांची जोपासना केल्यास नक्कीच ती फलदायी ठरतात.माथेरान मधल्या वनराई मुळे शुद्ध ऑक्सिजन मोफत मिळत आहे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी घनदाट झाडीची आवश्यकता आहे याचं झाडीच्या शीतल गारव्या मुळे पर्यटकांना माथेरानची भुरळ पडत असल्याने पर्यटकांची पाऊले नेहमीच माथेरानच्या दिशेने वळत असतात.पर्यटकांची संख्या वाढली तरच इथल्या सर्वसामान्य लोकांपासून उच्चभ्रू हॉटेल व्यावसायिक, श्रमिकांना रोजगार निर्माण होणार आहे. त्यामुळे दरवर्षी करण्यात येणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाचे



गांभीर्य लक्षात घेऊन या रोपांचे सुयोग्यप्रकारे संवर्धन करणे सुध्दा आवश्यक बनले आहे. सह्याद्रीच्या या डोंगरावरील रान जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत इथले पर्यटन अबाधित राहणार आहे अन्यथा इथे साधे पाखरू देखील फिरकणार नाही याकामी वनखात्याच्या अधिकारी वर्गाने त्यांच्या अखत्यारीत असणाऱ्या वन संरक्षक समिती मार्फत या रोपांचे उत्तम प्रकारे संवर्धन आणि देखभाल,जतन केल्यास माथेरान हे कायमस्वरूपी हरित आणि स्वच्छ हवेचे प्रदूषण मुक्त पर्यटनस्थळ आणखीन नावारूपाला येईल यात शंका नाही असे जेष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

जवळपास दोन हजार रोपे आणलेली आहेत यातील चारशे रोपांची लागवड दस्तुरी भागात करण्यात आली तर जे वृक्ष प्रेमी हौशी लोक आहेत त्यांना उर्वरित रोपांचे वाटप सुरू केले आहे.

**शंकर पवार, परिमंडळ वन अधिकारी माथेरान**

माथेरान मधील दरवर्षी झाडांची अतिवृष्टीमुळे होणारी पडझड पाहता खरोखरच इथे वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.नुकताच आमच्या वन समिती आणि वनखात्याच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून चांगल्या प्रकारे ही लागवड केली आहे. किती रोपे मागविण्यात आली होती,कोणत्या प्रकारची आहेत या मातीत ती रुजतील किंवा नाही याबाबत मला कल्पना नसून याबाबत कुठल्याही प्रकारची निविदा प्रक्रिया केल्याचे माहीत नाही.त्यामुळे अनावधानाने एखादं वेळी प्रसार माध्यमांनी काही माहिती प्रसिद्ध केल्यास अनाठायी आमच्या सारख्या प्रामाणिक लोकांना त्रास होतो.

**ज्ञानेश्वर बागडे, सदस्य वन संरक्षक समिती माथेरान**

इंदलकर सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं.६८९/२०२१
ने.ता.१२/०७/२१

कु.देवेंद्र दशरथ सुर्वे — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका तर्फे
जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा सदर अर्जदार याचा जन्म मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१३/०१/१९८७ रोजी झाला आहे. सदर अर्जदार याने त्याचे जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू सदर अर्जदार देवेंद्र दशरथ सुर्वे हा वर नमूद ठिकाणी जन्मलेला आहे किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०७ माहे जुलै सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल कर्नल जस्मेल सिंग चहल यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर, सर्व सिडकोचे पेमेन्ट पावती त्यांच्या नकळत हरवले आहे व बराच शोध घेवून देखील त्यांना ते अद्याप पर्यंत मिळालेले नाही. सदर मिळकतीचे वर्णन

**मालमत्तेचा तपशिल**
**सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, बिल्डींग नं.९,**
**सेलिब्रेशन के.एच ४ को.ऑप, हो.सो.लि. सेक्टर १६ व १७,**
**खारघर नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर, सर्व सिडकोचे पेमेन्ट पावती कोणाला सापडल्यास ते नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल व त्या कागदपत्रांसंदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑ.हौ.सोसायटी**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२, खारघर**
**मो.नं.८८७९४१६४८३**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही १) अनिता रवींद्र भोईर, २) रवींद्र वसंत भोईर यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ सदरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) अनिता रवींद्र भोईर<br>२) रवींद्र वसंत भोईर | १३०/१ | ०-५२-०<br>विक्री क्षेत्र<br>०-३७-०० | ६.६६ |

मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक १) अनिता रवींद्र भोईर, २) रवींद्र वसंत भोईर यांचेकडून सदरहू शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.०७/०७/२०२१**

**सही/-**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.१०१, बी विंग, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, पनवेल**
**मो.नं.८२८६१२१३३३**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही चंदा अभय आमडेकर, लीना/लीला श्रीनिवास कुलकर्णी यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ सदरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वाजापूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| चंदा अभय आमडेकर, लीना/लीला श्रीनिवास कुलकर्णी | १९ | ५-२६-०० | ५.७५ |

मौजे : वाजापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक चंदा अभय आमडेकर, लीना/लीला श्रीनिवास कुलकर्णी यांचेकडून सदरहू शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेणेबाबत बोलणी सुरू केली आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.०७/०७/२०२१**

**सही/-**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.१०१, बी विंग, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, पनवेल**
**मो.नं.८२८६१२१३३३**

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## गाळा विकणे आहे

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ग्रामपंचायतींच्या दिवाबत्तीची वीज पूर्ववत करावी

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

ग्रामपंचायतींच्या दिवाबत्तीचे वीज बील थकल्यामुळे अनेक ग्रामपंचायंतीचे दिवाबत्तीच्या वीज जोडण्या महावितरणने खंडीत केल्या आहेत त्यामुळे गावातील रस्त्यांवर अंधार पसरला आहे. याचा फटका मात्र नागरीकांना बसत आहे. रात्रीच्या अंधारात चाचपडत नागरीकांना प्रवास करावा लागत आहे.

शासनाने नुकतेच या बाबत परिपत्रक काढून ग्रामपंचायतीचे दिवाबत्तीचे बील हे ग्रामपंचायतीनी भरावे असे आदेश दिले आहेत. मात्र अनेक ग्रामपंचायतीनी हे बील भरले नसल्यामुळे महावितरणने त्या ग्रामपंचायतींची वीज तोडली आहे. महावितरण आणि ग्रामपंचायत यांच्यामधे ताळमेळ नसल्यामुळे आणि शासनाच्या चुकीच्या धोरणाचा त्रास विनाकारण नागरीकांना सहन करावा लागत असल्यामुळे महावितरणने ताबडतोब या ग्रामपंचायतींची दिवाबत्तीची वीज पूर्ववत जोडून द्यावी अशी विनंती जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी केली आहे. नुकतेच त्यांनी या बाबतचे पत्र महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता हरिदास चोंडे यांना दिले आहे.

## रोटरी क्लब पनवेल एलिटतर्फे लिखिते हॉस्पिटलमध्ये इन्फ्लूएंझा लसीकरण मोहीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारत सरकारने अलीकडेच नागरिकांना त्यांची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी १८ वर्षाखालील मुलांना लसीकरण करण्यासाठी इन्फ्लूएंझाची लस देण्यास प्रोत्साहित केले असून रोटरी क्लब ऑफ पनवेल एलिटने लिखीते हॉस्पिटल पनवेल येथे ६ महिने ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी इन्फ्लूएंझा लसीकरण मोहीम आयोजित केली होती. १४० मुलांना सामाजिक अंतराचे निकष विचारात घेऊन लसीकरण करण्यात आले. ज्यात लाभार्थ्यांना रुग्णालयात गर्दी होऊ नये म्हणून तयार करण्यात आलेल्या स्मार्ट फॉर्मद्वारे टाइम स्लॉटची निवड करण्याची परवानगी देण्यात आली. भविष्यात पुन्हा एकदा ही मोहीम राबवावी अशी मागणी करणार्या बर्याणच लाभार्थ्यांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला. रोटरी क्लब ऑफ पनवेल एलिटतर्फे पुन्हा एकदा महिन्याच्या कालावधीत इन्फ्लुएंझा लसीकरणाची मोहीम हाती घेण्याची योजना आखली आहे. लिखिते रुग्णालयात इन्फ्लूएंझा लसीकरण मोहीम प्रसंगी अध्यक्ष राज मुनोत, शिरीष जोशी, आशिष मेहता, सचिव रितेश मुनोत, हस्तीमल जैन, डॉ स्वाती लिखिते, मनोज मुनोत, मुकेश राजपूत, आरती मेहता आदि मान्यवरांसह बहुसंख्य रोटेरियन्स आणि ॲलन्स उपस्थित होत्या.



# नायट्रीक ॲसिडची असुरक्षित वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून ॲसिडगळती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील नदीपात्रात तसेच कशेडी घाटात रासायनिक सांडपाणी ओतण्याच्या घटनांत वाढ झाली असताना पोलादपूर शहरापासून तीन कि.मी. अंतरावर एका ट्रकमधून असुरक्षितरित्या सुरू असलेल्या नायट्रीक ॲसिडच्या वाहतूकीदरम्यान एक ड्रममधून ॲसिडची गळती सुरू होऊन मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पिवळ्या वाफांसह सर्वत्र खोकला आणि डोळ्यांची जळजळ होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र, दोन वेळा या गळक्या ड्रमवर पाण्याचा मारा करून ट्रक धुवून ॲसिड साफ करण्याचा यशस्वी प्रयत्न करीत हा ट्रक सुरक्षितरित्या मार्गस्थ झाला.



पोलादपूर शहरापासून काही अंतरावर लोहारे गावाच्या हद्दीत नायट्रीक ॲसिडचे लहान-मोठे बॅरल आणि ड्रम घेऊन एका ट्रकमधून असुरक्षितरित्या वाहतुक सुरू असताना अचानक ट्रकमधून राष्ट्रीय महामार्गाच्या नव्या काँक्रीटीकरणाच्या रस्त्यावरून ॲसिड गळती सुरू झाली. यामुळे हवेमध्ये पिवळ्या रंगाचे धुराचे लोट पसरू लागले आणि सायंकाळी करमणूक, फिटनेस तसेच आरोग्याच्या कारणावरून पायी चालणाऱ्या लोकांना यामुळे खोकला आणि डोळ्यांची जळजळ सुरू झाली. यावेळी ट्रक ड्रायव्हरने वाहन चालवित प्रथम एका ढाब्याजवळ आणून थोडा पाण्याचा मारा केला. मात्र, या तुटपुंज्या पाण्याचा माऱ्यामुळे परिसरात पिवळ्या धुराचे प्रमाण वाढले आणि तेथून ट्रकड्रायव्हरला सर्व्हिस सेंटरमध्ये पाण्याचा मारा करण्यास सांगण्यात आले. यामुळे तीन कि.मी.अंतर रस्त्यावर अनेक ठिकाणी ड्रममधून गळणाऱ्या नायट्रीक ॲसिडमुळे काँक्रीटच्या रस्त्यावरून तसेच चिखल मातीवरून वाफा येऊ लागल्या तसेच हा ट्रक पिवळ्या धुराच्या रेषा हवेत काढीत पोलादपूरनजिकच्या चरई फाट्याजवळील सर्व्हिस सेंटरमध्ये ट्रक आणून उभा करण्यात आला. मात्र, यादरम्यान अनेकांनी पत्रकार तसेच पोलीसांना फोन करून या उग्र वास आणि पिवळ्या धुराबद्दल माहिती दिली. त्यामुळे प्रस्तुत प्रतिनिधीने घटनास्थळी भेट देताच काहीच वेळाने पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव आणि हवालदार दीपक जाधव हे पोहोचले. यावेळी सदर ट्रक ड्रायव्हरची चौकशी करून ट्रक धुवून ॲसिडचा प्रभाव कमी करण्यास प्राधान्य देण्यात आले. त्यानंतर पोलीस ठाण्यात येण्याबाबत ट्रक चालकाला सांगण्यात आले. काही तासांनी सद-रचा ट्रक सुरक्षितरित्या मार्गस्थ झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदरचा ट्रक चिपळूण येथील असून लोटे एमआयडीसीपर्यंत ॲसिडची वाहतूक होणार असल्याचे राजू शिंदे नावाच्या ट्रक ड्रायव्हरने माहिती दिली.

नायट्रीक ॲसिडची असुरक्षित वाहतूक करणाऱ्या टँकरला ११ नोव्हेंबर २०१६ रोजी कशेडी घाट उतारावरील रत्नागिरी जिल्ह्यातील कशेडी आंबा या गावाजवळील वळण उतारावर गळती होऊन झालेल्या अपघातात ट्रकचालकाचा मृत्यू होऊन वाहतूक अनेक तास ठप्प झाली होती. यामुळे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून होणाऱ्या रासायनिक वाहतुकीचे गांभिर्य लक्षात घेऊन कोणत्याही हलगर्जीपणाची कृती झाल्यास स्थानिकांच्या आरोग्यालाही अपाय होऊ शकत असल्याने वाहतुकीवर योग्य नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. पोलादपूर तालुक्यात टँकरद्वारे सावित्री नदीपात्रात रासायनिक सांडपाणी सोडण्यात आल्याने मासे मरण्याची घटना आणि कशेडी घाटात टँकरमधून रासायनिक सांडपाणी डोंगरउतारावर सोडण्याची घटना तसेच अलिकडेच नदीच्या पाण्यावर पांढऱ्या ढगांसारखा फेस तरंगू लागल्याच्या घटनेनंतर रासायनिक पदार्थांच्या हाताळणीबाबतची बेपर्वाई तालुक्याच्या नैसर्गिक आरोग्याला व जनजीवनाला हानीकारक ठरू शकणार आहे. त्यामुळे हा टँकर असुरक्षितरित्या नायट्रीक ॲसिडची वाहतूक करीत असतानाही सुरक्षितरित्या मार्गस्थ झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# माथेरानमध्ये श्रमदानातून जनजागृती : राकेश कोकळे यांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नेहमीच माथेरान मधील सर्वसमावेशक समस्या असोत की अन्य काही यासाठी हिरीरीने सहभाग नोंदवून गावाला भेडसावत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्नशील असणारे प्रभाग क्रमांक सहा मधील धनगर समाजाचे कार्यशील अध्यक्ष तसेच कष्टकरी अश्वपाल राकेश कोकळे यांच्या माध्यमातून नेहमीच सकारात्मक कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.



आजही त्यांनी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार वेळेस लाकडाचा तुटवडा भासू नये यासाठी गावातील समाजसेवक आणि विविध संस्थेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लाकडांचा डेपो स्मशानभूमीत केला आहे. माथेरानमध्ये येथील स्मशानभूमीत शव जाळण्यासाठी लागणारी लाकडे संपल्याने एक दिवसाचे श्रमदान करून येथे लाकडे जमविण्याचे आव्हान केले होते त्यास माथेरानमधील स्थानिक लोकांनी प्रचंड प्रतिसाद देऊन आज येथील सर्व समाज्याच्या लोकांनी मोठ्या प्रमाणात लाकडे जमविली.

माथेरानमधील मुस्लिम समाज वगळता इतर सर्व हिंदू समाजातील व्यक्तींसाठी येथे एकमेव स्मशानभूमी आहे ज्याचा वापर सर्व समाजबांधव करीत असतात. त्यांच्या साठी येथील स्मशान भूमीमध्ये एक डिझेलवर चालणारी शवदाहिनी आहे तर पारंपरिक लाकडांवर जळण्याचीही व्यवस्था आहे. काहीवेळा डिझेलवर चालणारी शव दाहिनी बंद राहिल्यास लाकडांचा उपयोग करावा लागत असतो व ही लाकडे संपल्याने लाकडे जमविण्यासाठी श्रमदानाने आव्हाहन येथील स्थानिक तरुण राकेश कोकळे यांनी केले होते.

मागील काही महिन्यांमध्ये येथे मृत्यू प्रमाण वाढले होते.

त्यामुळे येथील स्मशानभूमीमध्ये लाकडांचा तुटवडा जाणवत होता त्यामुळे 'एक दिवस गावासाठी' ही संकल्पना राबविण्याचे ठरवले व त्यानुसार त्यांनी सोशल मीडियावर आवाहन केले त्यास प्रतिसाद देताना माथेरानमधील मराठा समाज, कोकणवासी समाज, धनगर समाज चर्मकार समाज, धोबी समाज, आदिवासी समाज व इतर समाजांनी आपले योगदान दिले.

# पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाने दडी मारल्याने भाताची लावणीस तयार झालेली रोपे पिवळी पडून करपायला लागली असून भातशेती संकटात सापडली असून शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणी केलेले भात बियाणे जून महिन्यात पडलेल्या पावसात वाहून गेले. त्यामुळे तुरळक प्रमाणात रुजलेल्या बियाणाने दुबार पेरणी करावी लागली.ही रोपे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लावणीस तयार झालेली असताना लावणीसाठी पाणी नसल्याने कामे खोळंबली आहेत तर काही ठिकाणी जमीन सुकल्यामुळे त्यातच उन्हाच्या तडाख्याने अक्षरशः करपण्यास सुरुवात झाली आहे.चारपाच दिवसात पाऊस न पडल्यास बहुतांशी गावातील भाताचे पीकावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संपुर्ण देशावर असलेले कोरोना महामारीचे संकट त्यातच आलेली निसर्ग तौक्ते चक्रिवादळे त्यामुळे तमाम जनता व शेतकरी वर्ग हैराण झाला असून त्यात पावसाळ्याच्या सुरुवा-तीला पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत अधिक वाढ झाली असून शेतकरी त्रस्त झाला आहे.

# जिल्ह्यामध्ये दि.01 ऑगस्ट रोजी होणार राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्याकडील पत्रानुसार संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि. ०१ ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्री. संदीप वि. स्वामी यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, १३८ एन.आय.क्ट खालील प्रकरणे,दिवाणी अपिले, तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे व अपिले ठेवली जाणार आहेत. तसेच नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यव होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. त्यामुळे दि. ०१ ऑगस्ट २०२१ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती विभा प्र. इंगळे यांनी केले आहे.

मा.ए.एम.शिंदे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.गुरुनाथ दत्ता भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो. वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.७००/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०८/२१

श्री.अभिजीत भिमसेन गडाकुंश
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.अमृत कुंभ को.ऑ.हौ.सो.लिमिटेड,
रुम नं.२०१, प्लॉट नं.१५३ ए, से.१ ई, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२१८
मो.नं.९१३७८९५२५८ अर्जदार

विरुद्ध

विवाह/जन्म मृत्यू नोंदणी निबंधक
महानगरपालिका पनवेल, कळंबोली विभाग
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे भाऊ कै.अक्षय भिमसेन गडांकुश मृत्यू तारीख १९/०६/२०१६ रोजी मौजे : कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन-४१०२१८ येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.७००/२०१९ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : ०७/०७/२०२१

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मे.मुजावर साहेब

ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७१७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/०८/२१

श्री.सिबलु राकेश पांडे
वय : ३५, धंदा : व्यापार
रा.के.एल.६, बिल्डींग नं.६, रुम नं.५,
सेक्टर ३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील म्हणजेच मयत कै.रामसुभाग पांडे यांची कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सदनिका क्र. | क्षेत्र | इमारतीचे नांव | सेक्टर, प्लॉट नं. |
|---|---|---|---|
| पहिला मजला | ५४.०३ चौ.मी. बिल्टअप | के.एल.- ६/६/१:५ | रुम नं.०५, बिल्डींग नं.६, सेक्टर ३ ई, कळंबोली |

अर्जदारांचे वडील कै.रामसुभाग पांडे यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.रामसुभाग पांडे व मयत कै.रामलली रामसुभाग पांडे यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.रामसुभाग पांडे व मयत कै.रामलली रामसुभाग पांडे यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ७/७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.प्रिती भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७३३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/०८/२१

१) श्रीमती.रेखा चंद्रकांत पुरंत
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.अर्चना प्रवणी जती
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.करजगी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर
३) सौ.कल्पना शिवानंद उमरगी
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.ता.उमरगा, जि.उस्मानाबाद
४) सौ.दिपा राकेश सोलंकी
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१५०, इंदिरा चाळ कमिटी,
एन.एस.एस.रोड, हनुमान मंदिर, सुंदर बाग
असलफा विलेज, घाटकोपर (प), मुंबई
५) सौ.राजश्री महालिंग आमाणे
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५६/७, भवानीपेठ, शाहिर वस्ती,
सोलापूर, जि.सोलापूर
६) कु.श्रद्धा चंद्रकांत पुरंत
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
७) कु.सबुरी चंद्रकांत पुरंत
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
८) कु.यशोवर्धन चंद्रकांत पुरंत
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
नं.१, ६ ते ८ रा.सदनिका नं.सी-३०२,
फोच्युन गार्डन, तुलीप बिल्डींग, कोप्रोली,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. चंद्रकांत कंठप्पा पुरंत यांचे निधन दि.१७/०२/२०१४ रोजी झालेले आहे. कै.चंद्रकांत कंठप्पा पुरंत यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**सदनिका नं.सी-३०२,**
**फोच्युन गार्डन, तुलीप बिल्डींग,**
**कोप्रोली, ता.पनवेल, जि.रायगड**
**कारपेट एकूण क्षेत्र ३७० चौ.फूट + ८४० चौ.फूट टेरेस**

वरील मिळकत ही कै.चंद्रकांत कंठप्पा पुरंत यांच्या मालकीची आहे. श्रीमती.रेखा चंद्रकांत पुरंत वगैरे हे कै.चंद्रकांत कंठप्पा पुरंत यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.रेखा चंद्रकांत पुरंत वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.चंद्रकांत कंठप्पा पुरंत यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.७/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७६७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२१

१) श्रीमती.शकुंतला एकनाथ कांडपिळे
वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रवींद्र एकनाथ कांडपिळे
वय : ५५ वर्षे, धंदा : व्यापार
दोघेही रा.घर नं.४५, नारायण नगर,
पोदी नं.३, सेक्टर १५, नवीन पनवेल
३) सौ.अंजली शेखर टिळेकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सदनिका नं.३०२, सरगम ए,
सिंहगड रोड, नांदेड शहर,
वडगांव बुद्रुक, पुणे ४११०४१ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. एकनाथ सदाशिव कांडपिळे यांचे निधन दि.१६/११/०२० रोजी झालेले आहे. तसेच कै.एकनाथ सदाशिव कांडपिळे यांची आई कै.सुगंधाबाई सदाशिव कांडपिळे यांचे निधन दि.३०/०१/२००६ रोजी झालेले आहे. कै.एकनाथ सदाशिव कांडपिळे यांच्या मालकीची खालील वर्णनाच्या मिळकतींचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**अ) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २३६/अ/१ | ०-१५-१० हे.आर.पॉ. पो.ख.०-००-८० | १२.२५ |
| २३६/ब | ०-०१-५० हे.आर.पॉ. | ०.३० |
| २३६/अ/२ | ४१-६२-०० चौ.मी. | ०.०० |

**ब) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील टी.पी.स्कीम नं.१ मधील ओरिजनल प्लॉट नं.३९५** (O.P.No.395) **चा फायनल प्लॉट नं.४१३/१ पैकी, क्षेत्र १०१९ चौ.वार आणि त्यावरील तळमजला+३ मजल्यांचे बांधकाम असलेली इमारत.**

**क) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील अंतिम भूखंड नं.१९९/ए, क्षेत्र ७०८ चौ.वार आणि त्यावरील तळमजला+३ मजल्यांचे बांधकाम असलेली इमारत.**

**ड) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| घर/मालमत्ता नं. | क्षेत्र |
|---|---|
| V3Z5002481/1 (जुना नं.४४) | |
| V3Z5004502/1 (जुना नं.४४) | |
| V3Z5002484/1 (जुना नं.४५) | |
| V3Z5002492/1 (जुना नं.४६) | |
| V3Z5002499/1 (जुना नं.४८) | |

वरील मिळकती ह्या कै.एकनाथ सदाशिव कांडपिळे यांच्या मालकीची आहेत. श्रीमती.शकुंतला एकनाथ कांडपिळे वगैरे हे कै.एकनाथ सदाशिव कांडपिळे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.शकुंतला एकनाथ कांडपिळे वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.एकनाथ सदाशिव कांडपिळे यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.७/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## संगीत एकता सांस्कृतिक कला व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आक्रोश आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संगीत एकता सांस्कृतिक कला व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आझाद मैदान मुंबई इथे एक कलाकार, लोककलावंत ह्यांचा आक्रोश आंदोलन करण्यात आले होते.

सदर आंदोलनात नवी मुंबई व रायगडच्या कलाकारांनी सहभाग घेतला होता. गेली १७ महिने घरी बसून आहे, तरी रंगभूमी खुली करावी आणि कलाकार ह्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून काही मागण्याचे निवेदन शासनाला देण्यात आले. सदर मोर्चाचे निमंत्रक हे लावणी महासंघ, मुंबई होते. तसेच यावेळी संगीत एकता रायगड ह्या संस्थेच्या कलाकार मोठ्या संख्येने मोर्च्यामध्ये सामील झाले होते.



## घरफोडीत ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बंद घराचे कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना तालुक्यातील पळस्पे येथे घडली आहे.

विशाल देवकर हे सुनिता बेडेकर यांच्या रुममध्ये राहण्यास असून या रुमच्या समोरील दरवाजाची कडी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी कोणत्या तरी वस्तूने तोडून त्यावाटे आत प्रवेश करून घरातील रोख रक्कमेसह सोन्याचे दागिने असा मिळून जवळपास २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कोलाड आरडीसी शाखेकडून आर्थिक व डिजिटल साक्षरता अभियान संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक अंतर्गत नाबार्ड स्थापना दिनाचे औचित्य साधून रा.जि.मध्यवर्ती सह.बँक अलिबाग कोलाड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक व डिजिटल साक्षरता अभियान कार्यक्रम शाखेच्या नजीक असलेल्या वरसगाव येथे राबविण्यात आला.

मंगळवार दि.६ जुलै रोजी राबविण्यात आलेल्या या अभियानप्रसंगी येथील सरपंच विशाखा राजिवले,ग्रा.सेवक रविंद्र ठाकूर,शाखाधिकारी भावना सरफळे व मोठ्या संख्येने बचत गटातील महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात शाखाधिकारी भावना सरफळे यांनी शाळेतील विद्यार्थी, शेतकरी बांधव व बचत गटातील महिलांना यांच्या व्यवसाय वृद्धी व प्रगतीसाठी अल्पदर कर्जाविषयी तसेच बँकेतील सर्व प्रकारच्या योजनांबद्धल माहिती व मार्गदर्शन करून अल्पबचतीचे महत्त्व पटवून दिले.

# विद्युत महामंडळाचा कहर सुरु ; एक महिना विद्युत बिल थकीत पुरवठा खंडित करण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

ग्रामीण भागातील जनता महागाईच्या कोंडीत त्यात विद्युत महामंडळाचा भरमसाठ वीजबिल त्या बिलांवर करांवर कर त्यात गेली दीड दोन वर्षे कोरोनासंकट तद्वंतर मोठं चक्रीवादळ मागील पावसाळ्यात अनेकदा महापुर अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे पीक वाया गेले. तसेच त्यातच सर्व सामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले महागाईने कळस गाठला ग्रामीण भागातील अनेक मजुरांचा रोजगार गेला, व्यवसाय बुडाला हातकमाई देखील गेली. त्यामुळे सामन्यांचे वीज कनेक्शन तोडू नका. बिलासाठी सक्ती करू नका यासाठी राज्याचे विरोधीपक्ष नेते तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वमान्य जनतेची व शेतकऱ्यांची वीज खंडित करू नका म्हणून राज्याच्या विधानसभेत तत्कालीन झालेल्या अर्थसंकल्पात मागणी केली. यासाठी राज्यात ठिकठिकाणी आंदोलने देखील केली गेली. त्यातच शहरी भागासह ग्रामीण भागातील शेकडो ग्राहकांना प्रचंड रक्कमेची वीज बिले आज देखील करांवर कर लावून येत आहेत. कोणाला हजार पाच हजार तर काहींची अधिकच यावर हद नाही त्यातच वीज महामंडळ विभागीय अधिकारी व कर्मचारी मंडळींचा दारावर येऊन तगादा वीज बिल भरा अन्यथा पुरवठा खंडित ही मोहीम हाती घेऊन गरीब गरजूंवर अन्यायाचा हातोडा मारण्याचा काम विद्युत महामंडळ करत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

कोरोना काळ सुरू झाल्यापासून चारही बाजूने ग्रामीण जनतेसह शेतकरी वर्गाला वेठीस धरण्याचा काम सरकारकडून सुरू आहे की काय असा संतप्त सवाल उठला आहे. एकीकडे महागाईचा कळस तर दुसरीकडे शाळांची फी वसुली थकीत त्यातच भरमसाठ वीजबिल यांनी साऱ्यांचे कंबडे मोडले कोरोनाशी सामना करता करता आता नागरिकांना महागाईशी सामना करावा लागतो. त्यात वीजबिल न भरल्याने पुरवठा खंडित करण्याचा अधिकारी मंडळींचा तगादा शेतकऱ्यांना भात शेती लागवडीला सामोरे जावे लागत आहे. इंधन वाढल्याने आधुनिक काळातील शेतीची नांगरणी न परवडणारी मजुरांची कमतरता त्यात मजुरी देखील वाढली त्यांच्या भाताची किंमत कवडी मोलाची त्यात बी बियाणे व रासायनिक खतांची देखील किंमती वाढल्या एक ना अनेक संकटाला ग्रामीण भागातील जनतेला सामोरे जावे लागत आहे.

वीज बिल माफी सोडाच त्यात सवलत देखील नाही धावत्या मीटरने साऱ्यांचेच धावणे बंद करण्याचा घाट रचला आहे यावर कोणतीच उपाय योजना नाही का? मीटर रिडींग प्रमाणे बिल भरा लाईटचा वापरच केला नाही तरी मीटर धावला कसा असा संतप्त सवाल केला जात आहे. रोहा कोलाड वीज वितरण विभागतही वीज वाढीव बिलांचा सावळा गोंधळ सुरू आहे. सामान्यांच्या घरात दोन तीन बल्ब, एक फॅन असताना हजारोंची बिल येतातच कशी ? याबाबत वारंवार आश्चर्य व्यक्त झाले. दुसरीकडे अनेक ग्राहकांना दोनतीन महिन्यांचे बिल दहा हजाराहून अधिक हे कसे वीज बिलांतून लूटमार सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले. दरम्यान सर्वच ग्राहकांना भरमसाठ वीज बिले येत आहेत, ग्राहक वीज पुरवठा खंडिता पोटी निमूटपणे भरत आहेत. सामन्यांच्या वाढीव वीज बिलांबाबत कोणीच दखल घेत नसल्याने एकच संताप व्यक्त होत आहे.

# पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दि.९ जून रोजी पनवेलमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. मुसळधार सरिंसह दिवसभरात पावसाने पनवेलला चांगलेच झोडपून काढले होते. त्यानंतर काही दिवस पावसाची संततधार पनवेल तालुक्यात सुरू होती त्यामुळे बळीराजा सुखावल्याने शेतीची कामे देखील योग्यरितीने सुरू झाली होती. परंतु पनवेल तालुक्यात पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे ऐन बहरात आलेली भातशेती संकटात सापडली आहे. सध्या भाताच्या रोपांची वाढ खुंटली आहे.

भातासह इतर रोपांना या काळात पाण्याची अत्यंत आवश्यकता असते, मात्र पाऊसच गायब झाल्यामुळे बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागले आहेत. पावसाअभावी तालुक्यात काही भागात भाताची रोपं करपू लागली आहे. याचा परिणाम पुढील काळात होणाऱ्या उत्पादन क्षमतेवर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने यंदा पावसाळ्याच्या सुरवातीला सरासरी ९७ टक्के पर्जन्यमान होईल, असा अंदाज वर्तवला होता. या आनंद वार्तेमुळे बळीराजा सुखावला होता. त्यानुसार जूनच्या सुरवातीला पावसाने हजेरी लावली. सुरवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.


पनवेल तालुक्यात ११५६.९६ हेक्टर शेतजमिनीचे पेरणी क्षेत्र असून त्यासाठी १२०० मिमी पाऊस होणे अपेक्षित होते. परंतु तालुक्यात यावर्षी पावसाळा सुरू झाल्यानंतर आजपर्यंत ९२३.८० मिमी पावसाची नोंद झाली असून सर्वसाधारण पर्जन्यमानाची तुलनात्मक टक्केवारी ३०.९७ इतकी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येऊन ठेपल्याने पनवेल तालुक्यात बळीराजा हवालदिल झाला आहे. त्यातच मे महिन्यात झालेल्या चक्रीवादळासह अतिवृष्टीमुळे जमिनीची अगोदरच धूप निघून गेली आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर पुढचे काही दिवस अधून मधून पावसाच्या सरींमुळे दोन-चार दिवसांत रोपे उगवण्यास सुरुवात झाली होती. मात्र मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे तळपत्या उन्हात रोपे करपून गेली आहेत.

पनवेल तालुक्यात भातशेतीचे क्षेत्र ८१५० हेक्टर आहे. भाजीपाल्याचे क्षेत्र साधारण ३२५ हेक्टर आहे. नाचणीचे पीक १० ते १५ हेक्टर मध्ये घेतले जाते. रायगड जिल्ह्यात भाताचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. प्रामुख्याने दरवर्षी १५ जुलै पर्यंत आवश्यक असणारा पाऊस पडला नाही तर भाताचे पीक वाया जाते. त्यामुळे पर्याय म्हणून काही ठिकाणी भाजीपाल्याचे पीक देखील घेतले जाते.

# मुरुडमध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । मुरुड**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने जिल्हानिहाय कोरोना बाधित रुग्णसंख्येनुसार असलेल्या पॉझिटिव्ह रेट व ऑक्सिजन बेडची उपलब्धता व प्रत्यक्षात ऑक्सिजनची आवश्यकता इत्यादी बाबींचा सर्वंकष विचार करून लागू करावयाच्या निर्बंधाबाबत विविध स्तर निश्चित केले आहेत. त्यानुसार रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी मागील दोन आठवड्याचा पॉझिटिव्ह रेट विचारात घेता पोलीस अधीक्षक रायगड यांचे कार्यक्षेत्रात तिसऱ्या स्तराचे सुधारित निर्बंध लागू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी, मोकळ्या जागेत संपूर्ण आठवडाभर सकाळी ५ वाजल्यापासून ते सकाळी ९ वाजेपर्यंतच चालणे, सायकलिंग करणे यास मान्यता आहे तसेच बाह्य मैदानी खेळास ५ वाजल्यापासून ते सकाळी ९ वाजेपर्यंत व सायंकाळी ६ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत परवानगी असताना मुरुड मध्ये मंगळवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास समुद्रकिनारी पनवेल येथून आलेले पर्यटक क्रिकेट खेळताना आढळले. तसेच डोंबिवली येथून आलेले पर्यटक समुद्र किनारी पोहण्याचा आनंद लुटत होते. त्या १२ पर्यटकांवर पोलीस कर्मचारी सचिन वाणी, विक्रांत बांधणकर, प्रीती वारिक ,तडवी यांनी विना मास्क फिरणे, सामाजिक अंतर न राखणे इत्यादी कोरोना संदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी कडक दंडात्मक कारवाई केली.



# नोकिया कंपनीने तयार केलेल्या एबीआयए व एएसआयए कार्डची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पालेखुर्द येथे स्कुटीवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी नोकीया कंपनीने तयार केलेल्या एबीआयए व एएसआयए कार्ड ज्याची किंमत जवळपास ७८ हजार रुपये इतकी आहे. याची चोरी झाली आहे.

जनार्दन बाबर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पहाटेच्या सुमारास पालेखुर्द येथे स्कुटीवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी सचिन दुर्गे यांच्या जागेतील कंपनीच्या मालकीच्या इंडस टॉवर यंत्रणेवरील एअरटेल कंपनीचे व नोकीया कंपनीने तयार केलेले एबीआयए व एएसआयए कार्ड या दोन कार्डची चोरी केल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अनैतिक संबंध ; खारघरमधील तरुणाला मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमध्ये राहणाऱ्या मोहम्मद सफीउल्ला अन्सारी याने त्याच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध ठेवणाऱ्या मोहम्मद इम्रान अब्दुल्ला शेख (२५) याला जबरदस्तीने मोटारसायकल वरुन निर्जन ठिकाणी नेऊन त्याला दोघा साथीदारांच्या मदतीने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या मारहाणीत इम्रान शेख जखमी झाला असून त्याला नेरुळ मधील डॉ.डी. वाय.पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर घटनेनंतर खारघर पोलिसांनी मोहम्मद अन्सारी आणि त्याच्या दोघा साथीदारांवर गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

सदर घटनेतील जखमी इम्रान शेख गोवंडी भागात राहण्यास असून त्याला मारहाण करणारा आरोपी मोहम्मद अन्सारी खारघर, सेक्टर-३४ मध्ये राहण्यास आहे. मोहम्मद अन्सारी २०१८ मध्ये गोवंडी येथे राहण्यास असताना इम्रान शेख याचे त्याच्या पत्नी सोबत प्रेमसंबंध निर्माण झाले होते. सदर बाब मोहम्मद अन्सारीला समजल्यानंतर त्याने इम्रान शेख याला दमदाटी केली होती. तसेच त्याच्या विरोधात गोवंडी पोलीस ठाण्यात तक्रार देखील केली होती. मात्र, मागील काही महिन्यांपासून मोहम्मद अन्सारी खारघर येथे पत्नीसोबत राहण्यास गेल्यानंतर देखील इम्रान शेख या मोहम्मद अन्सारी याच्या घरी जाऊन त्याच्या पत्नीला भेटत होता. याबाबतची माहिती मोहम्मद अन्सारीला समजली होती. त्यानंतर इम्रान शेख खारघर, सेक्टर-३४ मध्ये उतरुन तळोजाकडे पायी चालत जात असताना, मोहम्मद अन्सारी आणि त्याच्या दोघा साथीदारांनी त्याला अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर त्याला जबरदस्तीने मोटारसायकलवरुन जवळच्या मैदानात नेवून तेथे त्याला तिघांनी बेदम मारहाण केली. तसेच त्याच्यावर चावुने वार केले. यावेळी इम्रान शेख याने आरडा-ओरड केल्यानंतर तिघांनी तेथून पलायन केले. त्यानंतर जखमी इम्रान शेख याने तळोजा गावात जाऊन तेथील एका सुरक्षारक्षकाच्या मोबाईलवरुन आपल्या कुटुंबियांशी संपर्क साधत घडल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर त्याच्या नातेवाईकांनी त्याला नेरुळ मधील डॉ.डी.वाय.पाटील रुग्णालयात दाखल केले. सदर घटनेची माहिती मिळाल्यांनतर खारघर पोलिसांनी मोहम्मद अन्सारी आणि त्याच्या दोघा साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

# भात व नाचणी पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : तळा तालुका कृषी अधिकारी

**दै.रायगड नगरी । तळा**

सध्याच्या वातावरणातील बदलामुळे शेती करताना अनेक नैसर्गिक संकटांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी पंतप्रधान पीक विमा योजने अंतर्गत तळा तालुक्यातील भात व नाचणी पिकाचा समावेश केला आहे. त्यासाठी एच.डी.एफ.सी. इर्गो या कंपनीची नेमणूक केली आहे. या योजनेमध्ये वैयक्तिक शेतकऱ्यां बरोबरच कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी देखील सहभाग घेऊ शकतात.

सर्व शेतकऱ्यांना ही योजना ऐच्छिक आहे. ज्या कर्जदार शेतकऱ्यांना योजनेमध्ये सहभागी व्हायचे नसेल त्यांनी विहित नमुन्यात घोषणापत्र बँकेकडे सादर करणे अपेक्षित आहे. या योजने अंतर्गत पावसाचा अनियमीतपणा पूर, दुष्काळ, यामुळे शेतीचे नुकसान होऊन उत्पादन ५० टक्केपेक्षा कमी आल्यास विमा संरक्षण मिळते.


तसेच नैसर्गिक आग, अतीवृष्टीने दरडी कोसळणे, ढगफुटी, वीज कोसळणे यासारख्या स्थानिक नैसर्गिक आपत्ती व कापणीनंतर सुकवण्यासाठी ठेवलेल्या पिकाचे नुकसान झाल्यास विमा कंपनी मार्फत वैयक्तिक पंचनामे करून नुकसान भरपाई निश्चित केली जाते. परंतु वैयक्तिक पंचनामा होण्यासाठी घटना घडल्यापासून ७२ तासाचे आत विमा कंपनीला कळवणे आवश्यक आहे. भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ४५०००/- रुपये इतकी असून शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता ९१०/- रुपये प्रति हेक्टर (९.१० रुपये प्रति गुंठा) तसेच नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम २००००/- रु.असून शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता ४००/-रु. प्रति हेक्टर (४ रुपये प्रति गुंठा) इतका आहे.शेतकरी विमा अर्ज राष्ट्रीयकृत बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक किंवाआपले सरकार सुविधा केंद्र या ठिकाणी १५ जुलैपर्यंत सादर करू शकतात.

मागील वर्षी तालुक्यातील १०३ शेतकऱ्यांना ६.७५ लक्ष इतक्या रकमेची भरपाई या योजनेतून मिळाली आहे. तरी आपत्तीच्या काळामध्ये ही योजना शेतकऱ्यांना फायदेशीर असल्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभागी व्हावे.असे आवाहन सागर वाडकर तालुका कृषी अधिकारी तळा यांनी केले आहे.

# रोहा वनविभागातील महाड वन परिक्षेत्रातील रायगड किल्ला परिसर येथे हवाई बी पेरणी कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रोहा वनविभागातील महाड वन परिक्षेत्रातील रायगड किल्ला परिसर येथे (दि.०१ जुले) रोजी हवाई बी पेरणी कार्यक्रमाचा उदघाटन समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे उदघाटन मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे एस.व्ही. रामाराव यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी उप वनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत, सहाय्यक वनसंरक्षक रोहा विश्वजीत जाधव, वनक्षेत्रपाल महाड प्रशांत शिंदे, वनक्षेत्रपाल म्हसळा निलेश पाटील, वनक्षेत्रपाल मुरुड प्रशांत पाटील, वनक्षेत्रपाल श्रीवर्धन मिलिंद राऊत तसेच महाड वन परिक्षेत्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. जागतिक पातळीवर पर्यावरण विषयक बदलत्या परिस्थितीमुळे राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून जे क्षेत्र अतिदूर्गम आहे तसेच ज्या ठिकाणी पोहोचणे सुध्दा शक्य होत नाही, अशा ठिकाणी मातीची धूप होऊ नये म्हणून जैविक आच्छादन करणे गरजेचे असल्याने मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्लयांच्या परिसरातील अतिउताराच्या तसेच अतिदूर्गम क्षेत्रामध्ये हवाई बी पेरणीचा प्रायोगिक कार्यक्रम राबविण्याबाबतचे निर्देश दिलेले होते. त्यानुषंगाने रोहा वन विभागातील महाड वन परिक्षेत्रातील रायगड किल्ला परिसरातील हत्ती तलाव, हनुमान टाकी, दारुखाना, टकमक टोक, कोळीव तलाव, छत्रपती शिवाजी महाराज समाधी, काळा हौद, आडवा तट, बाराटाकी, कुशावर्त तलाव, हिरकणी बुरुज, मदरसा इत्यादी परिसरातील मजूरांमार्फत प्रचलित पध्दतीने वनीकरण करणे शक्य नसलेल्या अशा विखुरलेल्या स्वरुपातील एकूण २५ हेक्टर क्षेत्राची निवड सदर प्रायोगिक तत्वावर राबविण्याबाबतच्या कार्यक्रमाकरिता करण्यात आलेली होती.

या हवाई बी पेरणीकरिता खैर, शिसम, आवळा, बांबू, बहावा, करंज, रिठा, कांचन, बैल, जांभूळ, आपटा अशा स्थानिक प्रजातींची निवड करण्यात येऊन त्यापासून २५ हजार सीडबॉल तयार करण्यात आले. हवाई बी पेरणीकरिता सक्षम असलेल्या ड्रोनचे माध्यमातून ही सीडबॉलची पेरणी निवड करण्यात आलेल्या क्षेत्रावर करणेत आली. प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या क्षेत्राचे पॉलिगॉन घेण्यात आलेले असून हवाई बी पेरणी करण्यापूर्वी बी पेरणी करतानाचे हवाई फोटोग्राफी करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाचे सनियंत्रण अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पुढील तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत करण्यात येणार आहे. दि. ०१ ते ०६ जुलै २०२१ या दरम्यान किल्ले रायगड येथील २५ हे. क्षेत्रावर हवाई बी पेरणी पूर्ण करण्यात आली आहे, असे उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा आप्पासाहेब निकत यांनी कळविले आहे.

# पाणदिवे येथे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोना काळात मृत्युच्या दारात उभ्या असलेल्या रुग्णांना प्लाज्मा तसेच रक्ताची खूपच गरज असते. उरण तालुक्यातील अनेक गरजू व्यक्तींना रक्त तसेच प्लाज्मा वेळेवर न भेटल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे गोरगरीब गरजू व्यक्तींना, रुग्णांना वेळेत रक्त तसेच प्लाज्मा मिळावा, उरण तालुक्यातील गोरगरीब लोकांचे जीव वाचावेत, त्यांना त्वरित रक्त, प्लाज्मा मिळावेत या दृष्टीकोणातून श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार दि ११ जुलै २०२१ रोजी मुख्य रस्त्यालगत असलेल्या दत्त मंदिराच्या सभामंडपात पाणदिवे येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर रक्तदान शिबीर कोरोना विषयक शासनाचे सर्व नियमांचे पालन करूनच हे रक्तदान शिबिर होणार आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र बुधवंत हे उपस्थित राहणार आहेत. सदर रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याला विशेष प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्याचा गौरव केला जाणार आहे.तरी इच्छुक रक्तदात्यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील फोन नंबर -८०९७१ ०००७३,कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे -९७०२७५१०९८,उपाध्यक्ष हेमंत पवार -९०७६३ ७१५७२,सामाजिक कार्यकर्ते - सुनिल वर्तक-९८२०१३००८८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.